**L. A. BILL No. IV OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. २०२४ चा महा. अध्या. २.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;



(शा.म.मु.) एचबी ३०९९-१ (१४०–२-२०२४)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) कलम १५४ मध्ये, पोट-कलम (१ड) मधील, खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा ३.

"(अ-१) पोट-कलम (१क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२३-२४ यावर्षी सुधारित करण्यात येणार नाही ;

(दोन) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०२२-२३ यावर्षी जे होते तेच २०२३-२४ या वर्षासाठी असेल ;

(तीन) पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, जणू काही खंड (एक) हा, २०२३-२४ यावर्षी लागू नव्हता असे समजून, २०२४-२०२५ यावर्षी सुधारित करण्यात येईल.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२४ चा महा. अध्या. २.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.]

**[विधानसभेने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई